MHST110000892018

## <u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र.७/२०१८ मधील नि.७० वरील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द तूर्तातूर्त ताकिद मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>वादी यांचे कथनांचा सारांश पुढीलप्रमाणे :-</u>**

२. वादीने सदरचा दावा हा दावा मिळकतींचे सरस निास मानाने वाटप करुन मिळणेसाठी, जाहीर ठराव व गट नं.७१२ यामधील विहीरीचा व त्यामधील पाण्याचा हक्क मागण्यासाठी व इतर कारणांसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी हा खुनशी व धाडसी वृत्तीचा असून त्याच्याकडे पैसा व मनुष्यबळ आहे. त्या जोरावर वादीस सामाईक असणाऱ्या दावा विहीरीतून पाणी घेण्यास अलीकडे नुकतेच हरकत करु लागलेले आहेत. गट नं.७१२ मध्ये विहीर असून ती वडीलार्जित आहे. सदरची विहीर १९२ मध्ये खोदून सन १९९४ साली वडीलांनी विहीरीवर मोटार बसवलेली आहे. सदरची मोटर त्यांचे नावे आहे. वादीचे वडील जानेवारी २००२ मध्ये मयत झाले असून विहीरीवरील येणारे लाईट बील हे वडीलांच्या नांवे येते. परंतू, वादीचे वडीलांचे पश्चात सन २००३ ते २०१७ पर्यंत लाईट बिलाचे निम्म पैसे वादी हे प्रतिवादीकडे देत होते.

३. प्रतिवादीने दि.१२.०२.२०२१ रोजी विहीरीवरील फ्युज काढून नेल्या व वादीस पाणी घेण्यास हरकत केली. त्याबाबत वादीने प्रतिवादीस नोटीस दिली व पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर प्रतिवादीने वादीस पाणी घेण्यास आडकाठी केली नाही. गट नं.७१२ मधील विहीर ही सामाईक असून त्यातील पाण्याचा वादी वापर करत होते. दि.११.०३.२०२३ रोजी वादी हे विहीरीवरील मोटर चालू करुन पिकांना पाणी देण्यास

गेले असता प्रतिवादी क्र.१ व त्यांचा मुलगा विक्रम दिलीप नवले हे त्याठिकाणी आले व वादीस मोटर चालू करुन पाणी घेण्यास हरकत केली. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीस विचारणा केली असता प्रतिवादींनी वादीस दमदाटी केली. वादीस प्रतिवादींपासून भिती उत्पन्न झाल्याने वादी पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यास गेले असता पोलीसांनी कोर्टात वाद चालू असल्याने फिर्याद घेण्याचे नाकारले.

४. दावा मिळकतीपैकी काही मिळकती वडीलार्जित व काही मिळकत एकत्र कुटुंबात खरेदी केलेल्या आहेत. सदर मिळकतीत वादी यांचा सामाईक कायदेशीर हक्क आहे. सदरचा हिस्सा वादीस वाटून तुटक करुन मिळणार आहे, परंतू त्यास बराच कालावधी जाणार आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादीस सदर विहीरीवरुन पाणी घेवू दिले नाही तर वादीची पिके वाळून जाणार आहे व वादीचे कधीही आणि कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रथमदर्शनी वादीस केस आहे. न्यायाचा तराजूदेखील वादीच्या बाजूने आहे. प्रतिवादींना ताकीद दिल्यास त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, दाव्याचा अंतिम निर्णय लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी गट नं.७१२ मधील विहीर व इलेक्ट्रीक मोटार पाईपलाईन यावरुन वादीस पाणी घेण्यास हरकत अडथळा करु नये अशी तूर्तातूर्त ताकीद देण्याची व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी क्र.७२ अन्वये म्हणणे दाखल करुन वादीचे अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादींचे म्हणणे की, वादीचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. वादीचे मुळ दाव्यात ताकीदीसंदर्भात कोणतेही कथन नाही अगर विनंती कलमात मागणी नाही. प्रतिवादी यांनी विहीर अगर इलेक्ट्रीक मोटार व पाईपलाईन स्वतःच्या उत्पन्नातून खर्च करुन सर्व काही सोयी केल्या आहेत. यापूर्वी अगर आजपर्यंत केव्हाही वादी विहीरीतून पाणी घेत नव्हता अगर पिकांना पाणी पाजत नव्हता. वादी हा माजी सैनिक असल्याने व पेन्शन व रिटायरमेंटचा भरपूर पैसा असलेले प्रतिवादींवर दारु पिवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो. तसेच, अनावश्यक प्रतिवादींविरुध्द भांडणतंटा काढून पोलीस स्टेशनला पैशाचा जोरावर खोटया तक्रारी करत असतो.

६. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादीचा वाद विहीरीशी काही संबंध नव्हता. वादी यांचे तथाकथित दावा मिळकतीत आत्ता कोणतेही पीक नाही. यापूर्वी वादी जी काही पिके करत होता, त्यास धोम डावा कॅनॉलवरुन शेतीस पाणीपुरवठा करत होता. तसेच, नारायण नवले यांच्या विहीरीतून शेतीस पाणीपुरवठा करत होता व आहे. त्याचप्रमाणे वादीने त्याच्या हिश्यात कुपनलीकाही काढली आहे. तवादी हा नसलेले हक्क प्रस्थापित करु पहात आहे. वादी हा सहहिस्सेदार असल्याने त्याचे हक्क अलग व पृथ्थक केल्याशिवाय व त्या बाबी त्यांनी प्रस्थापित केल्याशिवाय कायद्याने वादीस प्रतिवादीविरुध्द तूर्तातूर्त ताकीद मागता येणार नाही. वादीस प्रथमदर्शनी केस नाही. प्रतिवादींविरुध्द ताकीद दिली गेल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. वादी प्रतिवादी यांचे वादकथनावरुन, खालील वादप्रश्न उपस्थीत होतात, सदर वादप्रश्न, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी सकृतदर्शनी प्रकरण असल्याचे शाबीत करतात काय ? | **..होय..** |
| २) | न्यायाचे समतोलत्व वादीचे बाजूने आहे काय ? | **..होय..** |
| ३) | मनाईचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **..होय..** |
| ४) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता :-**

८. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांनी युक्तिवाद केला की, वादीच्या मुळ दाव्यात ताकीदीसंदर्भात कोणतीही मागणी नसल्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. वादीचा विहीरीमधील मालकी अगर सामाईकातील हक्क या प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये स्पष्टपणे नाकारलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर विहीर इलेक्ट्रीक मोटार, पाईपलाईन स्वतःच्या उत्पन्नातून खर्च करुन सोयी केलेल्या आहेत. यापूर्वी वादी कधीही विहीरीतून पाणी घेत नव्हता अगर पिकांना पाजत नव्हता. वादी यास त्याच्या पिकांना पाणी देण्याकरीता धोम डावा कॅनॉल व कुपनलिका याची सोय आहे.

९. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये कलम २२ मध्ये नमूद केलेले आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी गट नं.७१२ मध्ये १९९२ चे सुमारास शेतीस पाण्याची सोय व्हावी स्वकमाईतून विहीर काढली आहे. त्याचा सर्व खर्च प्रतिवादीने केलेला असून वादी त्याच्या हिश्याचा खर्च देत नसल्याने त्यास पाणी देण्यास नकार दिला होता. विहीर काढण्याकरीता प्रतिवादी यांनी सुमारे पन्नास हजार रुपये खर्च केला होता. वादीने कोणतीही आर्थिक मदत केली नाही. वादीने त्याच्या हिश्याचा खर्च दिल्याशिवाय वादीला पाणी देण्याचा प्रश्न येत नाही. विहीरीचे लाईटचे बिल प्रतिवादी भरत आहे. विहीरीशी वादीचा काही संबंध नाही.

१०. प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ६० सोबत वादी व प्रतिवादी यांच्यात ०२.०५.२००३ रोजी झालेल्या वाटपपत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. प्रथमदर्शनी सदरचे वाटपपत्र लक्षात घेता सदरचे वाटपपत्र हे प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेले आहे. सदर कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी प्रतिवादी असे सुचित करत आहेत की, त्यांच्यामध्ये दि.०२.०५.२००३ रोजी वाटप झालेले आहे. परंतू, सदरचा कागद हा वाटप आहे किंवा कौटुंबिक तरतूद आहे हे गुणदोषावर ठरणार आहे. परंतू, सदर तथाकथित वाटप यादीमध्ये वादी व प्रतिवादी यांना कोणत्या मिळकतीमध्ये किती हिस्सा दिला हे नमूद आहे. तसेच, विहीर, मोटार, पाईपलाईन दोघांमध्ये व विहीरीची इतर कामे दोघांमध्ये करणे असे नमूद आहे. यावरुन वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वंशपरंपरागत विहीर असल्याचे दिसून येत आहे. सदरची विहीर गट नं.७१२ मध्ये असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

११. प्रथमदर्शनी वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब हे २००३ पर्यंत तथाकथित कौटुंबिक तरतूदीवरुन दिसून येत आहे. १९९२ साली वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र वहिवाटी होत्या असे म्हणण्यास काही हरकत नाही. गट नं.७१२ मध्ये विहीर खोदण्यास अथवा विहीरीचा देखभालीचा, लाईटबीलाचा खर्च वादी हे करत होते अथवा नाही हे दाव्याचा निकाल गुणदोषावर झाल्यावरच होईल. परंतू, प्रथमदर्शनी विहीरीमध्ये वादी यांना हिस्सा असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांनी हिल्ला हरकत केल्यास वादी यांच्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांना सकृतदर्शनी केस आहे. तसेच, न्यायाचा तराजूदेखील वादीच्या बाजूने आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना आदेशित करण्यात येते की, दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी गट नं.७१२ मधील विहीर व इलेक्ट्रीक मोटार पाईपलाईन यावरुन वादीस पाणी घेण्यास हरकत अडथळा करु नये अशी तूर्तातूर्त ताकीद देण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2024.04.20 17:31:34 +0530

**दिनांक** – २०.०४.२०२४ रविंद्र भ. खवले

**ठिकाण** – मेढा **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : Abhilash Sanjay Bagal |
| Court Name | : R. B. Khawale, J.M.F.C., Medha. |
| Order Date | : 20.04.2024 |
| Order signed by presiding officer on | : 20.04.2024 |
| Order uploaded on | : 20.04.2024 |